# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

FIT INDIA

# Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७ (भारत)
## Board of Sports & Physical Education Near. IUCAA, Ganeshkhind, Pune – 411007 (INDIA)
e-mail: directorsports@unipune.ac.in


संदर्भ: विक्रीमं/३/५८६ दिनांक: १० ऑगस्ट, २०२६.

## स्मरणपत्र

प्रति,
प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त परिसंस्था

विषय: महाविद्यालय/परिसंस्थेतील खेळाडूंचे भारत स्पोर्टस् पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करण्याबाबत...
संदर्भ: कार्यालयाचे विक्रीमं/४१८ दि. ०२ फेब्रुवारी, २०२६ चे पत्रक.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास यापूर्वीच भारत स्पोर्टस् पोर्टलवर महाविद्यलयीन खेळाडूंची ऑनलाईन नोंदणी करण्याबाबत कळविले आहे. उपरोक्त यंत्रणा तसेच विद्यापीठाच्या निदर्शनास खालील बाबी आल्या आहेत:

अ. अद्याप ब—याच महाविद्यालयातील खेळाडूंची नाव नोंदणी झालेली नाही.
ब. ज्या खेळाडू तसेच महाविद्यालयांनी नोंदणी केलेली आहे त्यांनी क्रीडाप्रकारांच्या सराव इत्यादी व्यतीरिक्तही अनेक फोटो अपलोड केलेले आहेत.

वरील बाबींची गांभीर्याने दखल घेऊन मा. राज्यपाल कार्यालयाच्या निर्देशानुसार उर्वरीत महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील खेळाडूंची ऑनलाईन नोंदणी लवकरात लवकर पूर्ण करावी. तसेच या पोर्टलवर, विद्यार्थी क्रीडा उपक्रमात सहभागी असल्याचे तसेच, सराव करीत असल्याचे व आपल्या महाविद्यालयातील क्रीडा सुविधांचा लाभा घेत असतानाचे फोटो अपलोड करावेत. ही विनंती. विषयाचे गांभीर्य लक्षात घेता लवकरात लवकर आपल्या स्तरावर संबंधितांना कार्यवाही करण्यास निर्देश द्यावेत.

धन्यवाद ! सहकार्याची अपेक्षा.

कळावे,

आपला,

(प्रा. डॉ. सुदाम शेळके)
सहा.क्रीडा संचालक (अतिरिक्त कार्यभार)

सेबत: कार्यालयाचे विक्रीमं/४१८ दि. ०२ फेब्रुवारी, २०२६ चे पत्रक.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
(Formerly University of Pune)
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७ (भारत)
**Board of Sports & Physical Education** Near. IUCAA, Ganeshkhind, Pune – 411007 (INDIA)
Telephone No. 02025622664, 66 e-mail: directorsports@unipune.ac.in

संदर्भ: विक्रीमं/३/४१८ दिनांक: ०२ फेब्रुवारी, २०२६.

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त परिसंस्था

**विषय : महाविद्यालयातील खेळाडूंची भारत स्पोर्ट्स पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणेबाबत.**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण) (प्रभारी) यांचे संदर्भ जावक पत्र क्र. RB /Edn.1/Gen -2026 CR- 018 /42 दि. १९ जानेवारी, २०२६ रोजी आपणांस या पत्राद्वारे विनंतीपुर्वक कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सलंग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विद्यार्थ्यांचे ‘भारत स्पोर्ट्स’ नावाने डिजीटल पार्टलवरती खालील लिंकवर लवकरात लवकर नोदंणी करण्यात यावी.

- महाविद्यालय नोंदणी लिंक : https://bharatsports.org/register/college
- विद्यार्थी नोंदणी लिंक : https://bharatsports.org/register/player

सबब मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण) (प्रभारी) यांच्यामार्फत पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. त्यास अनुसरून सोबत पत्र जोडत आहोत व त्याबाबतची कार्यवाही महाविद्यालयामार्फत नोंदणी लवकरात लवकर करण्यात यावी, ही विनंती.

धन्यवाद! सहकार्याची अपेक्षा!

कळावे,

आपला,

(प्रा. डॉ. सुदाम शेळके)
सहायक क्रीडा संचालक (अतिरिक्त कार्यभार)
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

GOVERNOR'S SECRETARIAT
RAJ BHAVAN
MALABAR HILL
MUMBAI 400 035

RB/Edn.1/Gen-2026/CR-018/42

१९, जानेवारी २०२६

प्रति,

मा. कुलगुरू,
राज्य विद्यापीठे (सर्व).

विषय : आपल्या विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील खेळाडूंची 'भारत स्पोर्ट्स पोर्टलवर' ऑनलाईन नोंदणी करणे बाबत.

महोदय/महोदया,

आपणांस विदित आहेच की, माननीय राज्यपालांचे सचिव यांचे निर्देशानुसार राज्यातील विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा नैपुण्यांची डिजिटली नोंद व्हावी या उद्देशाने "भारत स्पोर्ट्स" या नावाने डिजिटल पोर्टल तयार करण्यात आले आहे. आपणास हेही विदित असेल की, या वर्षाच्या "क्रीडा महोत्सव २०२५" साठीची कॉलेजनिहाय स्पर्धेत भाग घेणा-या विद्यार्थ्यांची "नोंदणी ते प्रमाणपत्र" याबाबतची डिजिटल नोंद भारत स्पोर्ट्स पोर्टल मार्फत करण्यात आली.

या संदर्भात मला आपणास अशी विनंती करण्याचे निर्देश आहेत की भारत स्पोर्ट्स या पोर्टलवर आपल्या विद्यापीठाशी संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची त्यांच्या क्रीडा नैपुण्याची नोंद भारत स्पोर्ट्स या पोर्टलवर घेणे आवश्यक आहे ज्यायोगे अशा विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी सुनियोजित प्रकारे प्रशिक्षण उपलब्ध करुन देता येवू शकेल, अशी धारणा आहे.

ही बाब लक्षात घेऊन आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या क्रीडापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील खेळाडूंची "भारत स्पोर्ट्स" पोर्टलवर ऑनलाइन नोंदी ठेवण्याकरिता आपल्या स्तरावरून महाविद्यालयाच्या सर्व प्राचार्यांना पत्राद्वारे निर्देशित करण्यात यावे व जास्तीत जास्त खेळाडूंची ऑनलाईन नाव नोंदणी करण्याकरिता विद्यापीठातील क्रीडा विभागामार्फत पाठपुरावा करण्यात यावा. यासाठी आपल्या विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण यांची ऑनलाईन बैठक आयोजित करून, खेळाडूंची नाव नोंदणी करण्याकरिता दिशा निर्देश द्यावेत.

आदरपूर्वक.

19/1/2026

(विकास कुलकर्णी)
मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण) (प्रभारी)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)


**क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ** आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७ (भारत)

**Board of Sports & Physical Education** Near. IUCAA, Ganeshkhind, Pune – 411007 (INDIA)

Telephone No. 02025622664, 66 e-mail: directorsports@unipune.ac.in


# STEP 1: Fill the Details

**College Login Link:** https://bharatsports.org/register/college





Generate your own Password

# Please Register Your College First

# STEP 1: Register your Players

**College Login Link:** https://bharatsports.org/register/player




**Any Physical Activity**

**Create your own Password**

**Less than 1 MB**